दोन

# गुलाम घराणे

## १. कुतुबुद्दीन ऐबक (इ.स. १२०६ ते १२१०)

गुलाम घराणे हे नाव कसे पडले ? सुलतान मोहम्मद घोरी हा निपुत्रिक होता. त्याच्याजवळ हजारो गुलाम होते. या गुलामांवर तो पोटच्या मुलांप्रमाणे प्रेम करी. मिनहा-जुस्सिराज लिहितो-मोहम्मदाला त्याच्या राज्याच्या भावी स्थितीबद्दल एका सरदाराने एकदा विचारले, तेव्हा सुलनानाने असे उत्तर दिले की, "इतर सुलतानांना एक किंवा दोनच मुले असू शकतात. पण माझे हजारो गुलामच माझी मुले आहेत. तेच माझ्या साम्राज्याचे वारस होतील आणि माझ्या पश्चात आपापल्या राज्यात खुतबामध्ये माझे नाव सुरक्षित ठेवतील." मोहम्मदाची ही भविष्यवाणी खरी ठरली. मोहम्मदाच्या पश्चात त्याचा पुतण्या गयासुद्दीन मोहम्मद गोरचा शासक झाला. परंतु तो एक दुर्बल शासक होता. त्यावेळी ख्वारीजमचा शासक गोर व गझनी दोन्ही प्रदेश जिंकू इच्छित होता. त्याचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य गयासुद्दीन मोहम्मदमध्ये नव्हते. त्याचप्रमाणे मृत मोहम्मद घोरीच्या सर-दारांपैकी काही खूपच शक्तिशाली व महत्त्वाकांक्षी होते व तेच राज्य बळकावण्यासाठी उत्सुक होते. मोहम्मदाच्या गुलाम सरदारात ताजुद्दीन एल्दौज, नासिरुद्दीन कुबाचा व कुतुबुद्दीन ऐबक हे प्रमुख होते. कुतुबुद्दीनाचे शौर्य व स्वामिनिष्ठा पाहून घोरीने त्यास भारतात नवीनच जिंकलेल्या प्रदेशांचा 'राज्यपाल' (Governor) नेमले. ऐबकानंतर दिल्लीच्या सिंहासनावर येणाऱ्या सुलतानांपैकी शमसुद्दीन अल्तमश व ग्यासुद्दीन बलबन इ. सुलतान आपल्या पूर्व जीवनात गुलाम राहून चुकले होते म्हणून या राजवंशास गुलाम घराणे असे म्हणण्याचा प्रघात आहे. परंतु आधुनिक इतिहासकारांना हे मत मान्य नाही कारण राज्यारोहणापूर्वी ऐबक, अल्तमश व बलबन इ. सुलतान आपल्या स्वामीच्या गुलाम-गिरीतून बंधमुक्त झालेले होते दुसरी गोष्ट अशी की, इ. सं. १२०६ ते १२९० पर्यंत ज्या गुलाम घराण्याने दिल्ली येथे राज्य केले असे आपण म्हणतो, तो एकच वंश नव्हता. या कालखंडात तीन निरनिराळ्या वंशांनी राज्य केले होते. अनुक्रमे कुतुबुद्दीन ऐबक, शम्सुद्दीन अल्तमश व ग्यासुद्दीन बलबन हे पुरुष त्या तीन वेगवेगळ्या राजवंशाचे संस्थापक होते. अशा स्थितीत या घराण्याला "गुलाम घराणे" असे म्हणणे सर्वथा अयोग्य होईल.

असे असले तरी परंपरेने इ.स. १२०६ ते १२९० पर्यंत दिल्लीला राज्य करणाऱ्या घराण्याला "गुलाम घराणे" असेच म्हणण्याचा प्रघात आहे.

### (१) कुतुबुद्दीन ऐबकाचे पूर्वचरित्र

गुलाम घराण्याचा संस्थापक व भारतातील दिल्ली येथील पहिला मुस्लिम शासक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुतुबुद्दीन ऐबकाचा जन्म तुर्कस्तानातील एका घरंदाज कुटुंबात झाला होता. दिसण्यात जरी तो कुरूप होता तरी तो अत्यंत होतकरू, परिश्रमी व बुद्धिवान होता. लहानपणीच त्याला काही लोकांनी पळवून निशापूरचा काझी अब्दुलअजीज कूफी फखरुद्दीन याला विकले. काझी स्वभावतःच दयाळू असल्याने त्याने ऐबकाला लिहिण्यावाचण्याचे व युद्धकलेचे शिक्षण देण्याची उत्तम सोय केली. काझीच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलांनी ऐबकाला एका व्यापाऱ्याला विकले. त्यानेच गझनीच्या बाजारात ऐबकाला मुईजुद्दीन मोहम्मद घोरीला विकले.

> **गुलाम घराणे हे नाव कसे पडले ?**
> १. कुतुबद्दीनाचे पूर्वचरित्र
> २. कुतुबद्दीनाचे राज्यारोहण
> ३. ऐबकाच्या मोहिमा :
> अ– बंगालची नवीन व्यवस्था
> ब– एल्दौजचा पराभव गझनी विजय
> क– राजपूत राजांचे पारिपत्य
> ४. कुतुबुद्दीन ऐबकाची योग्यता

मोहम्मदाकडे लवकरच ऐबकाचा भाग्योदय झाला. स्वामिभक्ती, शौर्य व कर्तव्यनिष्ठा इ. त्याच्या गुणांमुळे प्रभावित होऊन मोहम्मदाने त्याला वेगवेगळ्या पदांवर नियुक्त केले. काही दिवसांनंतर घोरीने त्याला 'अमीर-ए-आखूर' (Chief of Stable) या पदावर नियुक्त केले. ख्वारीजमवरील आक्रमणाच्या वेळी घोडदलाचे नेतृत्व मोहम्मद घोरीने ऐबकाकडेच सोपविले होते. भारतावरील मोहम्मदाच्या स्वाऱ्यांमध्ये ऐबकाने त्याला अनेक प्रकारे मदत केली. इ. स. ११९१ व ११९२ मधील तराईनच्या युद्धातील त्याच्या कामगिरीमुळे मोहम्मद एवढा प्रभावित झाला की, त्यामुळेच त्याने ऐबकाची भारतातील नव्याने जिंकलेल्या पंजाब ते आंतर्वेदीच्या प्रदेशावर आपला प्रशासक म्हणून नेमणूक केली. इ.स. ११९२ ते ११९७ पर्यंत ऐबकाने घोरीचा प्रतिनिधी या रूपाने भारतात काम पाहिले. या काळात त्याने राजपुतांच्या आक्रमणांचा शर्थीने मुकाबला केला व नवस्थापित मुस्लिम राज्याचा बचाव केला. इ. स. ११९७ ते इ. स. १२०५ पर्यंत त्याने चंदेल, सेन व पंजाबातील खोखर जमातीच्या बंडखोरांवर विजय मिळविण्यात सुलतानाला मदत केली. ऐबकाच्या आजपर्यंतच्या सर्व कार्यावर प्रसन्न होऊन मोहम्मद घोरीने त्याला भारतातील आपल्या सर्व प्रदेशांचा राज्यपाल (Governor) नेमले. अशा रीतीने मोहम्मदाच्या हयातीतच ऐबक त्याचा प्रमुख साहाय्यक सेनापती व प्रतिनिधी या रूपाने भारतात कार्य करीत होता. मोहम्मदाच्या मृत्यूनंतर या स्थितीचा फायदा घेऊन तो स्वतंत्र शासक होऊ शकला.



### (२) कुतुबुद्दीनाचे राज्यारोहण (२४ जून इ. स. १२०६)

मोहम्मद घोरीच्या कारकीर्दीच्या अखेरच्या काळात इ.स. १२०४ ते १२०६ मध्ये त्याच्याविरुद्ध ख्वारीजमचा शासक गझनी, मुलतान या ठिकाणी विरोधकांनी आपली शक्ती वाढविली. पंजाबात तर खोखरांनी थैमान घातले होते. हळूहळू सुलतानाने ख्वारीजमच्या शासकाला पराजित केले. गझनी व मुलतानही पुन्हा जिंकून घेतले आणि खोखराविरुद्ध ऐबकाच्या मदतीने मोहीम सुरू केली. खोखरांना पूर्णपणे जिंकून सुलतान २५ फेब्रु. १२०६ रोजी ऐबकासह लाहोरला आला. पराजयामुळे खोखर सुलतानावर एवढे चिडले होते की, त्यांनी सुलतानाला ठार मारण्याचा कट रचला. तबकात-ए-नासिरीचा लेखक मिनहाजुसिराज लिहितो की, 'लाहोरहून गझनीला परत जाताना सुलतानाचा मुक्काम जेलम जिल्ह्यातील धामियक येथे होता. १५ मार्च इ. स. १२०६ रोजी 'मुलाहिदा' परिवाराच्या एका व्यक्तीने सुरा खुपसून सुलतानाचा वध केला.' ताजन्उल-मासिरचा लेखक हसन निजामीने सुलतानाच्या मृत्युचे थोडे वेगळे वर्णन केलेले आहे. तो लिहितो की, "सुलतानाचा धामियक येथे एका ओढ्याकाठी मुक्काम होता. येथे संध्याकाळी सुलतान प्रार्थना करीत असताना काही दुष्ट लोकांनी त्याच्यावर अचानक हल्ला केला व त्याला ठार मारले."

मोहम्मद घोरीच्या आकस्मिक मृत्यूमुळे त्याच्या साम्राज्यात अव्यवस्था निर्माण झाली. या संधीचा फायदा घेऊन ताजुद्दीन एल्दोज व नासिरुद्दीन कुबाचा या मोहम्मदाच्या दोन सरदारांनी अनुक्रमे गझनी आणि मुलतान व ऊच या प्रदेशांवर आपली सत्ता स्थापन केली. हे पाहून लाहोरच्या नागरिकांनी कुतुबुद्दीनाला राजसत्ता स्वीकारण्याची विनंती केली. मोहम्मदाच्या मृत्यूनंतर तीन महिन्यांनी २४ जून १२०६ रोजी ऐबकाने स्वतःला राज्याभिषेक केला. सिंहासनारोहणाआधीच त्याने आपली स्थिती मजबूत करण्याकरिता चतुराईने वैवाहिक नीतीद्वारे समकालीन प्रबळ सरदारांशी घनिष्ठ संबंध स्थापित करण्याचा प्रयत्न केला होता. ऐबकाने एल्दौजच्या मुलीशी स्वतः लग्न केले व आपल्या बहिणीचे लग्न नासिरुद्दीन कुबाचाशी लावून दिले. तसेच आपल्या एका मुलीचे लग्न शम्सुद्दीन अल्तमश नामक आपल्या एका तरुण सरदाराशी लावून दिले. राज्यारोहणाच्यावेळी स्वतःसाठी त्याने "सुलतान" अशी सार्वभौमत्व सूचक पदवी न घेता 'मलिक' व 'सिपहसालार' (सुभेदार) या आपल्या पूर्वीच्या पदव्यांवरच संतोष मानला. ऐबकाने राजसत्तेची निदर्शक अशी आपल्या नावाची स्वतंत्र नाणीही पाडली नाहीत की, स्वतःच्या नावाने मशिदीत कधी खुतबाही पढविला नाही. म्हणूनच काही विद्वान त्याला स्वतंत्र शासक मानायला तयार नाहीत. इ. स.१२०८ मध्ये मात्र घोरचा सुलतान ग्यासुद्दीन मोहम्मद घोरीने त्याला राजचिन्ह, निशाण व पोषाख पाठवून त्याला "सुलतान" ही पदवी दिली. पण कुतुबुद्दीनाने तिचा वापर कधीच केला नाही.

### (३) कुतुबुद्दीन ऐबकाच्या मोहिमा

**(अ) बंगालची नवीन व्यवस्था :** राज्यारोहणानंतर ऐबकाला अनेक आपत्तींना तोंड द्यावे लागले. बंगाल प्रांत इख्तियारुद्दीन्‌मोहम्मद-बिन-बखत्यार खिलजीच्या नेतृत्वा-



Scanned with CamScanner

खाली स्वतंत्र झाला होता. बखत्यारच्या मृत्युनंतर गादीवर येणारा अलीमर्दान हा लखनौती येथे स्वतंत्रपणे राज्य करीत होता. तो जुलमी असल्यामुळे खिलजी सरदारांनी त्याला पकडून तुरुंगात टाकले व त्याच्या जागी मोहम्मद शेराला गादीवर बसविले. अली मर्दानने कशीतरी तुरुंगातून स्वत:ची सुटका केली व तो दिल्लीला जाऊन पोहोचला. त्याच्या आग्रहावरून कुतुबुद्दीनाने आपला प्रतिनिधी कैमाज रुमीच्यामार्फत प्रयत्न केल्यावर खिलजी सरदारांनी ऐबकाचे वर्चस्व स्वीकार केले. कुतुबुद्दीनाने अली मर्दानलाच पुन्हा बंगालचा सुभेदार नेमले. त्याने सुलतानाला वार्षिक खंडणी नियमित देण्याचे आश्वासन दिले.

### (ब) एल्दौजचा पराभव–गझनीचा विजय (इ. स. १२०८)

सुलतान मोहम्मद घोरीच्या मृत्यूनंतर गझनीचा शासक झालेला त्याचा गुलाम सरदार ताजुद्दीन एल्दौज हा अत्यंत महत्त्वाकांक्षी होता. घोरीच्या इतर सर्व गुलाम सरदारांनी आपली सत्ता मान्य करावी अशी त्याची इच्छा होती. परंतु हे असंभवनीय होते. एल्दौज नासिरुद्दीन कुबाचाचा द्वेष करीत असे ऐबकाने कुबाचाशी संपर्क स्थापित करून आपली स्थिती मजबूत केली. एल्दौजने लाहोर जिंकण्याचाही प्रयत्न केला. पण ऐबकाने त्याचा प्रयत्न हाणून पाडला. इतकेच नव्हे तर इ. स. १२०८ मध्ये त्याचा पराभव करून त्याचे गजनी शहरही जिंकून घेतले. परंतु ४० दिवसांतच शहर ऐबकाला सोडावे लागले. कारण, एल्दौज हा गझनीच्या नागरिकांचा अत्यंत आवडता शासक होता. ऐबकाचे गझनी जिंकणे त्यांना आवडले नाही. ही सर्व स्थिती लक्षात घेऊन ऐबकाने गझनी सोडून लाहोरचा मार्ग धरला. एल्दौजने पुन्हा गझनी जिंकून घेतले. अशा प्रकारे ऐबकाने एल्दौजचा भारतात वर्चस्व स्थापण्याचा प्रयत्न हाणून पाडला आणि दिल्लीच्या राज्याला मध्य आशियाई राजकारणात गुंतू दिले नाही.

### (क) राजपूत राजाचे पारिपत्य

मोहम्मद घोरी द्वारा पराजित हिंदू-राजपूत शासक अजूनही आपल्या स्वातंत्र्याकरिता प्रयत्नशील होते. मोहम्मद घोरीच्या मृत्यूनंतर ऐबक आपल्या इतर सहकाऱ्यांसह युद्धात गुंतलेला पाहून अनेक राजपूत शासक स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करू लागले. चंदेल राजा त्रैलोक्य वर्माने कालिंजर येथून तुर्कांची हकालपट्टी केली. प्रतिहारांनी ग्वाल्हेरचा किल्ला तुर्कांकडून पुन्हा जिंकून घेतला. आंतर्वेदीतील अनेक राजांनीही तुर्कांना कर देणे बंद करून त्यांना आपल्या राज्यातून हाकलून लावले. जयचंद राठोडचा वारस हरिश्चंद्रने बदायू व फरूकाबाद क्षेत्रात पुन्हा आपली स्वतंत्र सत्ता स्थापन केली. सेनवंशी शासकही पूर्व बंगालात आपली सत्ता स्थापन करण्यास उत्सुक होते. ऐबकने हरिश्चंद्राचा पराभव करून बदायू येथे अल्तमश याला आपला राज्यपाल नेमले. कालिंजर-ग्वाल्हेर मात्र तो जिंकू शकला नाही. आंतर्वेदीतील बंडाळींचा पूर्णपणे मोड करण्याआधीच आकस्मिकरीत्या ऐबक मरण पावला. तबकात-ए-नासिरीच्या लेखकाच्या मतानुसार इ.स. १२१० मध्ये चौगान (पोलो) खेळत असताना घोड्यावरून पडून तो मरण पावला. लाहोरमध्ये त्याचे दफन करण्यात आले.



### (४) कुतुबुद्दीन ऐबकाची योग्यता

ऐबकाने इ. स. १२०६ ते इ. स. १२१० पर्यंत म्हणजे केवळ चारच वर्षे राज्य केले. त्यावेळी भारतातील राजकीय स्थिती संपूर्णतया त्याला प्रतिकूल होती. तो शूर योद्धा व कुशल सेनापती होता. बुद्धिमत्ता व धोरणीपणा हे गुणही त्याच्या ठिकाणी होते. या गुणांमुळेच तो साधारण गुलामाच्या दर्जापासून वाढत वाढत दिल्लीच्या नवस्थापित मुसलमानी राज्याच्या संस्थापकाचा दर्जा प्राप्त करू शकला होता. मोहम्मद घोरीबरोबर अनेक लढायांत भाग घेऊन त्याने आपली कर्तबगारी व स्वामिभक्ती सिद्ध केलेली होती. आपल्या मालकासाठी त्याने अनेक प्रदेश जिंकले. पण स्वत:च्या कारकीर्दीत मात्र त्याने कोणतेही नवे प्रदेश जिंकले नाहीत. गझनी जिंकूनसुद्धा त्याला सोडून द्यावे लागले. राजपुतांचे बंडदेखील त्याला मोडता आले नाही. मोहम्मद घोरीच्या मृत्यूनंतर दिल्लीच्या राज्याला घोरी साम्राज्यापासून वेगळे करण्यात त्याने दाखविलेली दूरदृष्टी निश्चितच प्रशंसनीय म्हटली पाहिजे. त्यामुळे दिल्लीच्या स्वतंत्र राज्याची स्थापना होऊ शकली, एका परक्या देशात प्रबळ विरोधकांच्या अस्तित्वात स्वकीयांचे पाठबळ नसताना, विविध आपत्तींना धैर्याने तोंड देऊन इस्लामी राज्याची भारतात मुहुर्तमेढ रोवणारा पहिला शूर पुरुष म्हणून ऐबकाचे नाव भारतीय इतिहासात सदैव लिहिले जाईल. डॉ. आर. पी. त्रिपाठींच्या मते, "त्याचे कार्य कमी महत्त्वाचे नाही. त्याने भारतात मुस्लिम सत्तेच्या प्रसाराला मदत केली पण त्याचे सर्वांत महत्त्वाचे कार्य गझनीच्या सार्वभौमत्वापासून भारताची सुटका करणे हे होते अशा प्रकारे परकीय हस्तक्षेपापासून मुक्त असलेल्या एका स्वतंत्र राज्याच्या स्थापनेचा मार्ग त्याने प्रशस्त केला."

ऐबकाच्या राज्यव्यवस्थेची समकालीन मुसलमान इतिहासकारांनी मुक्तकंठाने स्तुती केलेली आहे. परंतु त्यात सत्यांश फार कमी आहे. तबकात ए नासिरीच्या लेखकाने मिनहाज-उस-सिराजने त्याला "समकालीन जगातील सर्वश्रेष्ठ पराक्रमी व दानशूर शासक" मानले आहे. त्याला दानधर्म करण्याची आवड होती. त्यामुळे लोक त्याला "लाखबक्ष" (लाख रुपये देणारा) असे म्हणत. हसन निजामी (ताजुल मासिरचा लेखक) व फख्रेमुदीरसारखे प्रतिभाशाली लेखक त्याच्या दरबारी होते.

कुतुबुद्दीन ऐबक धर्मनिष्ठ मुसलमान होता. पूर्ववर्ती मुस्लिम शासकांची मूर्तिभंजनाची परंपरा त्यानेही आपल्या कारकीर्दीत चालू ठेवली. त्याने दिल्ली व अजमेर येथे अनेक हिंदू मंदिरांचा विध्वंस करून त्याच सामग्रीने अनेक मशिदी निर्माण केल्या. इ.स. ११९१ मध्ये त्याने दिल्ली येथे 'कुव्वत-उल-इस्लाम' व इ स. १२०० मध्ये अजमेर येथे दुसरी मशीद उभारली. ती 'ढाई-दीन-का झोपडा' या नावाने ओळखली जाते. ख्वाजा कुतुबुद्दीन या मुस्लिम संतांच्या स्मरणार्थ त्याने दिल्ली येथे कुतुबमीनारची उभारणी केली. त्याच्या आकस्मिक मृत्यूमुळे अपूर्ण राहिलेले या व इतर अनेक इमारतीचे बांधकाम पुढे सुलतान शम्सुद्दीन अल्तमश याने पूर्णत्वाला नेले.



Scanned with CamScanner

## २. सुलतान शम्सुद्दीन अल्तमश (इ. स. १२१० ते इ. स. १२३६)

> ३. सुलतान शम्सुद्दीन अल्तमश
> (इ. स. १२१०–१२३६)
>
> पूर्वचरित्र,
> अल्तमश राज्यापहर्ता होता काय ?
> अल्तमशच्या अडचणी–
> अडचणींचे निराकरण–
> १. एल्दौजचा पराभव,
> २. मंगोलांची स्वारी,
> ३. कुबाचाचा पाडाव,
> ४. बंगालवर स्वारी,
> ५. राजपुतांवर स्वाऱ्या
> खलिफाकडून मान्यता,
> सुलतानाचा मृत्यू,
> योग्यता,
> कुतुबुद्दीन ऐबक व अल्तमशच्या कामगिरीची तुलना,
> भारतातील मुसलमानी सत्तेचा 'वास्तविक संस्थापक' कोण ?

**पूर्वचरित्र :** शम्सुद्दीन अल्तमश हा गुलाम घराण्यातील पहिला ख्यातिप्राप्त सुलतान होता. त्याचा बाप आलमखान हा तुर्कांच्या इलबरी टोळीचा खान (प्रमुख) होता. अल्तमश अत्यंत देखणा, कुशाग्र बुद्धीचा व प्रतिभाशाली असल्याने त्याचे इतर भाऊ त्याचा फार द्वेष करीत. या द्वेषापायी लहान वयातच त्यांनी अल्तमशास बुखाऱ्याकडे जाणाऱ्या एका व्यापारी तांड्यास विकून टाकले. शेवटी तो जमालुद्दीन नामक एका व्यापाऱ्याच्या हाती पडला. या व्यापाऱ्याने अल्तमशला कुतुबुद्दीनास विकले. ऐबकाकडे आल्यानंतर अल्तमशने लेखन, वाचन व युद्धविद्या आदींचे जीवनोपयोगी ज्ञान प्राप्त केले. हळूहळू आपल्या गुणांनी तो सर्वांचा आवडता आला. ऐबकाने लवकरच त्याची नेमणूक अश्वशाळेचा प्रमुख (अमीर–ए–आखूर) या पदावर केली. पुढे त्याची योग्यता लक्षात घेऊन ऐबकाने त्याची इ. स. १२०५ मध्ये गुलामगिरीतून सुटका केली आणि आपल्या कन्येशी त्याचा विवाह लावून दिला. काही दिवसांनंतर बदायूंचा सुभेदार म्हणून त्याची नेमणूक करण्यात आली. ऐबकाच्या मृत्यूनंतर दिल्ली येथील सरदारवर्गाने अल्तमशला राज्यसूत्रे हाती घेण्यासाठी आमंत्रण दिले. त्यांच्या विनंतीप्रमाणे दिल्लीस येऊन तो तख्तनशीन झाला. (इ. स. १२१०).

**अल्तमश राज्यापहर्ता (Usurper) होता काय ?**

आधुनिक इतिहासकार अल्तमशवर गुलाम घराण्याचे राज्य अवैधानिकरीत्या बळकावल्याचा आरोप करतात. कारण त्याने ऐबकाचा मुलगा आरामशहास पदच्युत करून दिल्लीचे सिंहासन प्राप्त केले होते. परंतु हा समज चुकीचा वाटतो. अल्तमशचे राजघराण्याशी निकटचे संबंध होते. ऐबकास फक्त तीनच मुली होत्या, पुत्र नव्हता असा उल्लेख समकालीन इतिहासकार करतात. तत्कालीन प्रबळ तुर्क सरदारांचाही अल्तमशला भरघोस पाठिंबा होता. त्यावेळच्या धामधुमीच्या परिस्थितीत नवीन स्थापन झालेल्या तुर्क राजसत्तेची धुरा सांभाळण्याची पूर्ण कुवत त्याच्यात होती. याशिवाय, त्याने आपल्या राजसत्तेस बगदादच्या खलीफांची मान्यतादेखील मिळविली होती. तो पराक्रमी व शूर असून आपल्या अंगभूत गुणांवर दिल्लीचा सुलतान झालेला होता. त्यामानाने त्याचा



प्रतिस्पर्धी आरामशहा हा अगदीच दुर्बल व कुचकामी होता. भारतासारख्या परकीय देशात नव्याने स्थापन झालेल्या मुसलमानी राज्याचे नेतृत्व समर्थपणे करण्याची योग्यता त्याच्यात नव्हती. म्हणूनच डॉ आर. पी त्रिपाठी म्हणतात, "अपहरण करण्यासच काहीही नव्हते, तर अल्तमश राज्यापहरण करणारा कसा ठरेल ?"[1] डॉ. त्रिपाठींनी अल्तमशवरील आरोपांचे निराकरण करण्याकरिता प्रस्तुत केलेली विचारसरणी दोन्ही बाजूंची माहिती विचारात घेता आम्हालाही तर्कसंगत वाटते.


**अल्तमशच्या अडचणी :** गादीवर बसल्याबरोबर अल्तमशला अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. दिल्लीचे सिंहासन म्हणजे काही पुष्पशय्या नव्हती. सिंधचा राजा नासिरुद्दीन कुबाचा व गझनीचा शासक ताजुद्दीन एल्दौज त्याचे राज्य गिळंकृत करण्याकरिता टपून बसले होते. जालोर, रणथंभोर, कलिंजर व ग्वाल्हेर इ. राजपूत राज्ये परत स्वतंत्र झाली होती. गंगेचा दोआब व बंगालमधून सुलतानाची सत्ता नामशेष झाली होती. मध्य आशियात मंगोलांच्या हालचाली वाढल्या होत्या. एकूण परिस्थिती फार गंभीर होती.

**अडचणींचे निराकरण :** सर्वप्रथम सुलतानाने मुइजी (मोहम्मद घोरीचे) व कुतबी (ऐबकाचे) सरदारांचे पारिपत्य केले. आपली सत्ता स्थिर करण्याकरिता त्याने आपल्या विश्वासातल्या चाळीस निवडक गुलामांची एक नवीन प्रबळ संघटना चरगान 'चालीसगनी' या नावाने निर्माण केली. त्यांना 'स्तून–ए–सल्तनत' (राज्याचे आधारस्तंभ) म्हणत. त्यांना विशेष अधिकार देण्यात आले होते. या संघटनेच्या साहाय्याने पुढे त्याने अनेक महत्त्वाची कार्ये संपादन केली. कालांतराने या संघटनेचे शासनव्यवस्थेत इतके प्राबल्य झाले की, सुलतान त्या संघटनेतील सरदारांच्या हातातील कळसूत्री बाहुले झाला.

**(१) एल्दौजचा पराभव (इ.स. १२१५) :** गझनीचा शासक ताजुद्दीन एल्दौज हा अल्तमशचा प्रमुख शत्रू होता. मध्य आशियातील ख्वारीझमच्या सुलतानाने एल्दौजचा पराभव करून त्याला गझनीहून पिटाळून लावले. त्यामुळे त्याने भारताकडे आपला मोर्चा वळविला. एल्दौजने नासिरुद्दीन कुबाचाच्या ताब्यातील पंजाबचा स्थानेश्वरपर्यंतचा प्रदेश जिंकला. हा धोका अधिक वाढू नये याकरिता इ. स. १२१५ मध्ये अल्तमशने तराईनच्या युद्धात एल्दौजचा पराभव करून त्याला कैद केले. पुढे कैदेतच त्यास ठार मारण्यात आले.

**(२) मंगोलांची स्वारी (इ. स. १२२० ते १२२१) :** तैमुजीन उर्फ चंगीझखान हा मंगोलांचा जगप्रसिद्ध पुढारी होता, त्याने सर्व मध्य आशिया पादाक्रांत करून विशाल साम्राज्य स्थापले होते. ख्वारीझमच्या सुलतानाशी मंगोलांचे हाडवैर होते. चंगीझखानाने ख्वारीझमच्या सुलतानाचा पराभव करून त्यास पिटाळून लावले. ख्वारीझमचा राजपुत्र जलालुद्दीन मंगबर्नी हा मात्र अल्तमशकडे आश्रय मिळेल या आशेने इ. स. १२२० मध्ये भारतात आला. त्याचा पाठलाग करीत मंगोल भारतीय सीमेवर येऊन थडकले. जलालाने

[1] Altumash was not a usurper for the simple reason that there was nothing to be usurped." Some Aspects of Muslim Administration. R. P. Tripathi.




सरहद्द प्रदेशातील खोखर लोकांच्या साहाय्याने कुबाचाचे अनेक प्रदेश जिंकून लाहोरचा मार्ग धरला. अल्तमश मंगोलांची शक्ती व क्रौर्य ओळखून होता. त्याने मोठ्या धूर्ततेने जलालुद्दीनाला मदत करण्याचे नाकारले. मंगवर्नीचा निरोप घेऊन येणाऱ्या वकिलाचाही अल्तमशने तत्काल वध करविला यामुळे निराश होऊन इ.स. १२२४ मध्ये जलालुद्दीनाने भारत सोडून इराणमध्ये प्रवेश केला. मंगोलही त्याच्या मागोमाग निघून गेले. अशा रीतीने मोठ्या मुत्सद्देगिरीने चंगीझखानाच्या भयानक आक्रमणापासून अल्तमशने नव-स्थापित तुर्कराज्याचे संरक्षण केले.

(३) कुबाचाचा पाडाव (इ. स. १२२८) : एल्दीजच्या पराभवानंतर अल्तमशने इ. स. १२१७ मध्ये कुबाचापासुन लाहोर जिंकले. कुबाचाने सुलतानाचे प्रभुत्व मान्य



केले. त्यानंतर जलालुद्दीन मंगवर्नीने कुबाचाच्या प्रदेशात शिरून बरीच लुटालूट केली असल्याने त्याच्या राज्यात फारच अव्यवस्था माजली होती. मंगोलसुद्धा जलालचा पाठलाग करीत मुलतानपर्यंत येऊन ठेपले होते. अशा रीतीने सर्व बाजूंनी कुबाचा संकटांनी वेढला होता. ही संधी साधून सुलतानाने इ. स. १२२७ मध्ये ससैन्य चाल करून भटिंडा व लाहोर इ. त्याची ठिकाणे जिंकून मुलतानला वेढा दिला. या विजयांनी घाबरलेल्या कुबाचाने भक्करच्या अजिंक्य किल्ल्याचा आश्रय घेतला. सुलतानाने या किल्ल्यालादेखील वेढा दिला. शेवटी कुबाचा निरुपायाने प्राणरक्षणार्थ गुप्तपणे किल्ल्यातून बाहेर पडून बोटीने सिंधू नदी ओलांडू लागला. परंतु त्याच्या दुर्दैवाने ऐन प्रवाहात बोट उलटली आणि त्यास जलसमाधी मिळाली.

(४) बंगालवर स्वारी (इ. स. १२२६ ते इ. स. १२३०) : ऐबकाचे वेळी येथे अलीमर्दान हा शासक होता. त्याचा वध करून हिसामुद्दीन इवाज हा त्याचा सरदार गयासुद्दीन खिलजी या नावाने स्वतंत्रपणे शासन करू लागला. आपल्या राज्यात कोणाचेही स्वतंत्र अस्तित्व सुलतानास मान्य नव्हते. दक्षिण बिहारवर आपले आधिपत्य स्थापन करून सुलतान बंगालवर चालून आला. सुलतानाचे बळ ओळखून गयासुद्दीनाने त्याला वार्षिक खंडणी देण्याचे कबूल करून समेट केला. परंतु अल्तमशची पाठ फिरताच त्याने पुन: बंडाचे निशाण उभारले. त्यापुळे इ. स. १२३० मध्ये सुलतानाने बंगालवर आपला मुलगा नासिरुद्दीन मोहम्मद यास पाठविले. लढाईत गयासुद्दीन मारला गेला. त्याच्या जागेवर अलाउद्दीन जानी नामक सरदाराची सुलतानाने नेमणूक केली.

(५) राजपुतांवर स्वाऱ्या : अल्तमशचे लक्ष स्वत:ची सत्ता दृढ करण्याकडे असल्याने राजपुतांस आपली सत्ता व शक्ती वाढविण्यास आपोआपच संधी मिळाली होती. ऐबकाने जिंकलेली सर्व राजपूत राज्ये मधल्या काळात पुन: स्वतंत्र झाली होती. हे पाहून सुलतानाने त्यांच्याकडे आपला मोर्चा वळविला. इ. स. १२२६ मध्ये त्याने रणथंभोर, इ.स. १२३२ मध्ये ग्वाल्हेर व इ. स. १२३३ मध्ये कालिंजर इ. ठिकाणे जिंकली. त्याचप्रमाणे अजमेर, कनौज, बनारस, बयाना, जालोर, भेलसा व उज्जैन इ. प्रदेशही अल्तमशने जिंकले.

**खलिफाकडून मान्यता (इ. स. १२२८) :** अल्तमशच्या विजयांवर प्रसन्न होऊन बगदादचा खलिफा अल-मुस्तान्सिर-बिल्ला याने इ. स. १२२८ मध्ये अल्तमशला 'सुलतान-ए-हिंद'ची पदवी व राज्यसत्तासूचक सन्मानाची वस्त्रे देऊन त्याचा गौरव केला. राजकीय व धार्मिक दृष्टीने ही फार महत्त्वाची घटना होती. त्यामुळे अल्तमशच्या सत्तेस कायद्याची मान्यता मिळून मुसलमानी समाजात त्याची प्रतिष्ठा वाढली. अल्तमशच्या नाण्यांवर खलिफाच्या नावाचा उल्लेख करण्यात येऊ लागला.

**सुलतानाचा मृत्यू (एप्रिल इ. स. १२३६) :** अल्तमश कट्टर सुन्नीपंथी मुसलमान होता. त्याच्या कारकीर्दीत शिया व सुन्नी पंथांच्या लोकात तीव्र मतभेद होते. शियापंथी लोकांनी सुलतानाची हत्या करण्याचा अनेक वेळा प्रयत्न केला; परंतु त्यांना याबाबतीत यश मिळाले नाही. एप्रिल १२३६ मध्ये एकाएकी आजारी पडून सुलतान मरण पावला.



Scanned with CamScanner

**योग्यता :** अल्तमश हा शूर योद्धा व कुशल सेनापती होता. शौर्य, साहस, बुद्धिमत्ता व मुत्सद्दीपणा हे त्याचे प्रमुख गुण होते. त्याची कारकीर्द निःसंशयपणे यशस्वी होती. ऐबकाला ज्याप्रमाणे घोरीचा पाठिंबा व मदत होती, त्याप्रमाणे अल्तमशला कोणाचेही साहाय्य नव्हते. त्याने जे काही संपादन केले ते स्वपराक्रम व कर्तृत्वशक्तीच्या जोरावर केले होते. त्याला शून्यातून नवी सृष्टी निर्माण करावी लागली. त्याने मुलतान, सिंध, माळवा, रजपुताना व आधुनिक उत्तर प्रदेशाचा बराचसा भाग स्वपराक्रमाने जिंकला होता. ऐबकाच्या सत्तासंपादनास स्थायी स्वरूप देण्याचे महत्कार्य त्याने केले होते. आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा नाश करून राज्यातील प्रभावी तुर्क सरदारांना त्याने धाकात ठेवले होते. अल्तमशचे राज्य 'लष्करी राज्य' (Military State) होते, ही राज्यपद्धती अल्लाउद्दीन खिलजीच्या कारकीर्दीत पूर्णत्वास पोहोचली.

अल्तमशने चंगीझखानाच्या विनाशकारी आक्रमणापासून नवस्थापित तुर्क राज्याचे संरक्षण केले. परंतु सुव्यवस्थित व सुसंघटित शासनव्यवस्थेला लागणारी आवश्यक अशी रचनात्मक प्रतिभा त्यात नव्हती. तो उच्च दर्जाचा सैन्याधिकारी होता. मुलकी शासनव्यवस्थेचे त्याला ज्ञान नव्हते त्याने शुद्ध अरबी पद्धतीची सोन्याचांदीची नाणी प्रचारात आणली. त्याने प्रचलित केलेल्या चांदीच्या नाण्यांचे (टंकाचे) वजन १७५ ग्रेन होते. त्याने अनेक मध्य आशियाई व भारतीय मुसलमानांना उच्च पदांवर नियुक्त केले. तो त्यांचा प्रेमी होता.

अल्तमश धार्मिकदृष्ट्या कट्टर सुन्नी मुसलमान होता. कुराणाच्या नियमानुसार तो दिवसातून पाच वेळा नमाज पढत असे. शियापंथी लोकांवरही त्याची वक्रदृष्टी होती. माळव्यावरील स्वारीत त्याने हिंदूंची शेंकडो वर्षांपासून सुप्रसिद्ध असलेली भेलसा व उज्जैन येथील अनेक मंदिरे नष्ट केली.

सुलतानास वास्तुकलेची फार आवड होती. भव्यता, प्रमाणबद्धता व सौन्दर्याकरिता प्रसिद्ध असलेल्या कुतुबमिनारचे बांधकाम त्यानेच पूर्ण केले. ऐबकाने बांधलेल्या दिल्ली येथील कुव्वत-उल्-इस्लाम मशिदीचा त्याने विस्तार केला. दिल्ली शहराला पाणीपुरवठा करण्याकरिता हौज-ए-शम्सी नावाचा विशाल तलाव त्याने बांधला होता. डॉ. ए. एल श्रीवास्तव यांच्या मतानुसार, अल्तमशने मुख्यतः तीन कार्ये केली. (१) मंगोलांच्या आक्रमणापासून नवस्थापित तुर्क राज्याचे संरक्षण करणे, (२) बगदादच्या खलिफाकडून राज्याला कायदेशीर मान्यतेचा आधार मिळवून देणे व (३) दिल्ली येथे आपल्या वंशाची स्थापना करून राजसत्ता वंशपरंपरेने आपल्या घराण्यात ठेवण्याची व्यवस्था करणे इत्यादी. इतिहासकार सर वुल्जले हेग अल्तमशला गुलाम वंशातील सर्वश्रेष्ठ सुलतान असे म्हणतात. तर डॉ. हबीबुल्ला त्यास 'गुलाम घराण्याचा वास्तविक संस्थापक' मानतात.

अल्तमशचा समकालीन तबकात-इ-नासिरी चा लेखक मिनहाज-उस-सिराज त्याच्याबद्दल असे लिहितो की, "इतका दयाळू, धर्मपरायण, विद्वान व साधुसंतांचा आदर करणारा दुसरा कोणीही शासक दिल्लीच्या सिंहासनावर बसला नव्हता." समकालीन लेखकांनी अल्तमशचा उल्लेख 'ईश्वराच्या प्रदेशाचा संरक्षक' व 'ईश्वराच्या सेवकांचा



साहाय्यकर्ता' इ. रूपाने केलेला आहे. त्यामुळेच त्याला गुलाम घराण्यातील सर्वश्रेष्ठ शासक म्हणून मानावे लागेल.

**कुतुबुद्दीन ऐबक व अल्तमशच्या कामगिरीची तुलना**

तसे पाहिल्यास ऐबक व अल्तमश हे दोघेही पूर्वायुष्यात गुलामच होते. आपल्या अंगभूत शौर्य व पराक्रमाच्या बळावर दोघांनीही सुलतानपदाची प्राप्ती केली होती. दोघेही शूर योद्धे व कुशल सेनानायक होते. भारतात त्यांनी अनेक लढाया जिंकल्या होत्या. एतद्देशीय हिंदू राजांचा पराभव करून भारतात मुसलमानी सत्ता स्थापन करण्याचे श्रेय निरपवाद ऐबकालाच द्यावे लागेल. परंतु ही कामगिरी संपादन करण्यास ऐबकाला खुद्द मोहम्मद घोरीची वेळोवेळी मदत झालेली होती, अल्तमशला अशा प्रकारची मदत कोणाकडूनही मिळालेली नव्हती. त्याची साधने सीमित होती. इतरांच्या मदतीपेक्षा स्वतःच्या बाहुबळावरच त्याला जास्त विश्वास ठेवावा लागला. भारतासारख्या परकीय देशात ऐबकाला केवळ हिंदूंशीच लढाया कराव्या लागल्या त्यामानाने अल्तमशची स्थिती फार भिन्न होती. ऐबक मोहम्मद घोरीचा गुलाम होता तर अल्तमश ऐबकाचा म्हणजेच पर्यायाने एका गुलामाचा गुलाम होता. त्याला परधर्मीय लोकांशी तर संघर्ष करावे लागलेच, परंतु एल्दोज कुबाचा आदी मातब्बर स्वकीयांच्या विरोधालाही तोंड द्यावे लागले याशिवाय, अल्तमशच्याच कारकीर्दीत कुप्रसिद्ध मंगोलनेता चंगीझखानानेही भारतावर स्वारी केली होती. ही भयंकर आपत्ती मोठ्या मुत्सद्देगिरीने बाजूला सारून त्याने तुर्क राज्याचा बचाव केला होता. अल्तमशला सोडवाव्या लागणाऱ्या समस्या पूर्णपणे नवीन होत्या. याउलट ऐबकाचे संपूर्ण जीवन लढायातच गेले होते. सुलतानपद प्राप्त केल्यानंतर सत्तेला बळकटी आणणे, राज्यकारभाराचा गाडा हाकणे व शासनसंघटन करणे इ. गोष्टी करण्यास त्याला मुळीच उसंत मिळाली नव्हती या अभावांची पूर्तता साहजिकच अल्तमशला करावी लागली व ती त्याने यथायोग्यपणे केलीही यात संशय नाही. भारतात मुसलमानी राज्याची स्थापना करून ऐबकाने भारताचा गझनी साम्राज्याशी असलेला संबंध तोडला होता. त्यावेळी भारत गझनी साम्राज्यात मोडत असे. ऐबकाची ही कामगिरी मोठीच मानावी लागेल. परंतु ऐबकाच्या राजसत्तेला बगदादच्या खलिफाची मान्यता कधीच नव्हती. ती मान्यता मिळवून देण्याचा खरा मान शम्सुद्दीन अल्तमशलाच द्यावा लागेल. खलिफाकडून राजवस्त्रे व पदव्या प्राप्त झाल्याने अल्तमशच्या सत्तेला राजकीय व सामाजिक मान्यता मिळालेली होती.

ऐबकाच्या राज्याचा पाया मजबूत नव्हता तर अल्तमशच्या राज्याचा पाया अधिक बळकट होता. त्याचे राज्यही ऐबकाच्या राज्यापेक्षा अधिक विस्तृत व एकजिनसी होते. ऐबकाचे राज्य अव्यवस्थित व असंबद्ध होते, तर अल्तमशने हिंदू राज्यांचा पाडाव करून व स्वकीयांचा विरोध मोडून, परकीय आक्रमणापासून देशाचे संरक्षण करून, एका सुव्यवस्थित व सुसंघटित अशा राज्याची उभारणी केली होती.

दोघेही उदार व न्यायप्रिय शासक होते. परंतु त्यांचे हे औदार्य व न्यायप्रियता मुसलमानांपुरतीच मर्यादित होती. दोघांनीही भारतीय शासकांशी युद्ध करून त्यांच्या



Scanned with CamScanner

मूर्ती व देवळांचा विध्वंस केला होता. साहित्य व कलाकौशल्याची आवड दोघांनाही सारखीच होती. परंतु त्यांच्या कारकीर्दीचा बराच काळ युद्धात गेला असल्याने या क्षेत्रात ते डोळे दिपविणारे कार्य करू शकले नाहीत. दोघांचेही व्यक्तिमत्त्व व कामगिरीचा आढावा घेता अल्तमशलाच श्रेष्ठ मानावे लागेल यांत शंका नाही.

**भारतातील मुसलमानी सत्तेचा 'वास्तविक संस्थापक' कोण ?**

या प्रश्नासंबंधी आधुनिक इतिहासकारात एकवाक्यता दिसून येत नाही. बरेचसे इतिहासकार हा मान अल्तमशलाच देतात. खरे पाहिल्यास आठव्या शतकातच मोहम्मद–बिन–कासीमने भारतात प्रवेश करून सिंध व मुलतानमध्ये मुसलमानी सत्तेची स्थापना केली होती परंतु ही सत्ता तेथे अधिक कालावधीपर्यंत तग धरू शकली नाही. एतद्देशीय लोकांनी तिचे अस्तित्व अल्पावधीतच नामशेष केले होते. अरबांच्या या आक्रमणानंतर अकराव्या शतकात वायव्येकडील खैबर खिंडीतून महमूद गझनीने भारतावर एकूण सतरा स्वाऱ्या केल्या. त्याने पंजाबही जिंकून घेतला होता येथे मुसलमानी राज्य स्थापन करण्याची धमक व कर्तबगारी महमूद गझनीत नि:संशयपणे होती. परंतु महमूद गझनीच्या स्वाऱ्या प्रामुख्याने येथील अपार संपत्ती लूटून नेण्याच्या लोभापायीच झाल्या होत्या. येथे कायम स्वरूपाची मुसलमानी सत्ता स्थापन करण्याची त्यास इच्छा नव्हती. एखाद्या झंझावाताप्रमाणे त्याच्या सर्व स्वाऱ्यांची अवस्था होती. तो निघून जाताच पुन: "जैसे थे"चा कारभार सुरू होई.

मुसलमानी सत्तेची योजनाबद्ध व पद्धतशीररीत्या स्थापना करण्याचे श्रेय मोहम्मद घोरीलाच देणे योग्य होईल. त्याच्या चार प्रतापी सेनापतींनी संपूर्ण उत्तर भारत जिंकून घेतला होता. परंतु भारताची स्वतंत्र अशी मुस्लिम सत्ता मात्र त्याने स्थापन केलेली नव्हती. त्यावेळी उत्तर भारत हा गझनी साम्राज्याचा एक भाग होता. मोहम्मदाने येथे दीर्घकाळ वास्तव्य केले नव्हते. भारतीय प्रदेशाचा कारभारही त्याने आपला प्रतिनिधी ऐबक याकडेच सोपविलेला होता अशा स्थितीत त्याला "भारतीय शासका" ची (King of India) पदवी देणे अयोग्य होईल. तो मान वस्तुत: ऐबकालाच दिला पाहिजे. त्यानेच दिल्लीला पहिल्या मुस्लिम राज्याची स्थापना केली होती. त्यानेच भारताचा गझनीशी असलेला संबंध तोडला होता आणि तो स्वतंत्र शासक या नात्याने येथे राज्य करीत होता. परंतु ऐबकालाही स्वतंत्र शासक मानण्यात काही ठोकळ अडचणी आहेत. स्वतंत्रतेची सूचक अशी जी राजचिन्हे मानली जातात, ती त्याच्या बाबतीत दुर्दैवाने आढळत नाहीत. ऐबकाचे एकही नाणे आजमितीस उपलब्ध झाले नाही. तात्त्विकदृष्टया आपल्या सत्तेला खलिफाकडून मान्यता मिळविण्याचा हेतुपुरस्सर केलेला प्रयत्न सुलतानशाहीच्या इतिहासात पाहावयास मिळतो. असा प्रयत्न ऐबकाने केल्याचे दिसत नाही. काही विशिष्ट कारणाने गझनीचा सुलतान गियासुद्दीन मोहम्मदाने ऐबकाचे स्वातंत्र्य मान्य केले होते. परंतु कायद्याने ही मान्यता देण्याचा अधिकार फक्त खलिफालाच होता. राज्याभिषेकाच्या वेळी ऐबकाने 'सिपहसालार' अथवा 'सुभेदार' ही पदवी धारण केली होती. हे पद प्रांताधिकारी किंवा राज्यपालाच्या दर्जाचे मानले जाते, स्वतंत्रतेचे निदर्शक नव्हे गझनीचा शासक



एल्दौजने ऐबकाच्या सत्तेला आव्हान दिले होते. ऐबकाचे राज्य असंबद्ध व अव्यवस्थित होते. राज्याची ही स्थिती त्याच्या मृत्यूबरोबरच समाप्त झाली. म्हणून बरेचसे इतिहासकार ऐबकास 'भारतातील मुसलमानी सत्तेचा वास्तविक संस्थापक' (Real founder of the Muslim power in India) नव्हे, तर केवळ दिल्लीचा सुभेदारच मानतात.

कुतुबुद्दीन ऐबकानंतर त्याचा कर्तृत्वहीन मुलगा आरामशहा हा तख्तारूढ झाला. त्याने 'सुलतान' ही उपाधी धारण केली. स्वत:च्या नावाची नाणी पाडली, स्वतंत्र शासकाची ऐट धारण केली. परंतु त्यालाही सुलतानपद धारण करण्याचा अधिकार होताच, असे निश्चितपणे म्हटले जाऊ शकणार नाही. कारण तो ऐबकाचा औरस वा अनौरस वारस होता याबद्दलची शंका अनेक इतिहासकार व्यक्त करीत असतात. देशात शांतता राहावी म्हणून अथवा राज्यावरील संकट टळावे म्हणून विशिष्ट परिस्थितीत कुतुबी अमीरांनी त्यास गादीवर बसविले असावे. कर्तबगार शासकाच्या ठिकाणी असणाऱ्या गुणांची कमतरता त्याच्या ठिकाणी होती. ऐबकाच्या मृत्यूनंतर खंडित होणाऱ्या दिल्ली येथील नवस्थापित राज्याचा बचाव करण्याची धमक त्याच्यात नव्हती. त्यामुळे त्यालासुद्धा वास्तविक संस्थापकाचा मान देणे अनुचित ठरेल.

दिल्लीच्या सरदारांनी ऐबकाच्या मृत्यूनंतर अल्तमशला राज्यारोहणाकरिता पाचारण केले. त्यांपैकी सत्ताप्राप्तीकरिता मोहम्द घोरीच्या अन्य सरदारांतही चढाओढ लागली होती. दिल्लीचे सुलतानपत्र प्राप्त करण्याची धडपड प्रत्येकजण करीत होता. मध्य आशियात मंगोलांच्या हालचाली वाढल्या होत्या. भारतावरही त्यांची स्वारी होण्याची शक्यता होती. अशा बिकट स्थितीला अल्तमशला तोंड द्यावे लागले. जर त्यावेळी ही सत्ता कमकुवत शासकाच्या हातात पडली असती, तर कदाचित भारतातील मुसलमानी राज्याचे अस्तित्वही कायमचेच संपुष्टात आले असते अल्तमशने स्वपराक्रमाच्या जोरावर तुर्की सत्तेचे अंतर्गत व बाह्य संकटांपासून संरक्षण करून तिचा पाया भारतभूमीत अधिक दृढ केला. मुसलमानांचा सर्वोच्च सत्ताधारी जो खलिफा, त्याच्याकडून राजचिन्हे प्राप्त करून भारतातील मुस्लिम सत्तेला राजकीय, सामाजिक व नैतिक मान्यता मिळवून देऊन तिची प्रतिष्ठा वाढविली होती. चंगीझखानाच्या विनाशकारी आक्रमणापासून अल्तमशने दिल्ली राज्याचे संरक्षण केले होते. बंगाल व बिहार पुन्हा जिंकून ते दिल्ली राज्याच्या संरक्षणाखाली आणण्याचे व दुआबातील सर्व बंडखोरी नष्ट करण्याचे महत्कार्यसुद्धा अल्तमशने पार पाडले. मोहम्मद घोरी व ऐबकाने पराभूत केलेल्या शासकांना व इतरही अनेक रजपूत शासकांना अल्तमशने आपली सत्ता मान्य करण्यास भाग पाडले. ऐबकाने केवळ एका विशाल राज्याची स्थापना केली होती. हे राज्य संघटित व सुरक्षित करण्याकरिता त्यास वेळ मिळाला नव्हता. ऐबकाचे अपुरे कार्य अल्तमशने पूर्ण केले होते. त्याने राज्याच्या बळकटीकरिता केलेल्या कार्याचे सुपरिणाम त्याच्या वारसांकरिता साहाय्यकारक ठरले. त्याने उत्तराधिकाराचा प्रश्न सोडवून वारसा हक्क आपल्याच घराण्यात सातत्याने राहील अशी व्यवस्था केली. त्यामुळे भारतातील 'मुसलमानी राज्याच्या वास्तविक संस्थापका'चा मान त्यालाच देणे उचित ठरेल.



Scanned with CamScanner

## सुलताना रझिया बेगम (इ. स. १२३६–१२४०)

### राज्यारोहण (९ नोव्हे. इ.स. १२३६)

| सुलताना रझिया बेगम |
| --- |
| १. राज्यारोहण |
| २. रझियाचे कार्य |
| ३. योग्यता |

रुकमुद्दीन फिरोजच्या मृत्यूनंतर अल्तमशची शूर व धाडसी कन्या रझिया ही 'सुलतान रझियतुद्दीन' अशी पदवी धारण करून ९ नोव्हे. इ.स. १२३६ रोजी गादीवर बसली. खरे तर अल्तमशने आपल्या हयातीतच तिला आपला वारस ठरविले होते. त्यावर त्याच्या सरदारांनी त्याला पृच्छा केली असता सुलतान त्यांना म्हणाला होता. "माझी तरुण मुले तारुण्यातील सुखात रंगून गेली आहेत. त्यांच्यापैकी एकाच्याही ठिकाणी राज्यकर्त्याचे गुण नाहीत. या प्रदेशावर राज्य करण्याला ते नालायक आहेत. माझ्या मृत्यूनंतर तुम्हास असे आढळेल की, माझ्या मुलीखेरीज राज्याला योग्य मार्गदर्शक दुसरा कोणीही नाही." अल्तमशचे हे उद्‌गार पुढे खरे ठरले. रझियाला राज्यकारभाराचा अनुभव चांगला होता. राज्यकर्त्यास आवश्यक असे सर्व गुण तिच्या ठायी होते ती न्यायी, उदार व स्वयंबुद्धीने निर्णय घेणारी होती. स्वभावाने ती धीट व साहसी होती. मुसलमानी प्रथेविरुद्ध ती पर्दा (गोषा) न बाळगता पुरुषी वस्त्र धारण करून खुल्या दरबारात धीटपणे कार्य करीत असे.

**रझियाचे कार्य :** राज्यारोहणानंतर स्वतःच्या व्यवहारकुशलतेने व मुत्सद्देगिरीने सर्व सरदारांवर आपली जरब बसवून तिने सर्वांना चकित केले. पंजाब, बंगाल व बिहारच्या प्रांतीय सुभेदारांनी तिची सत्ता मान्य केली. परंतु बदायू, मुलतान, हासी व लाहोरच्या सरदारांचा तिला विरोध होता. रुकनुद्दीन फिरोजचा वजीर निजामुल-मुल्क-जुनैदीसुद्धा त्यांना जाऊन मिळाला. तिने मोठ्या युक्तीने या सर्व विरोधकांत फूट पाडली व त्यांना पराजित केले. आपली सत्ता बळकट करण्याकरिता आणि विरोधी सरदारांना धाकात ठेवण्याकरिता तिने आपल्या चाहत्या व समर्थक अशा अन्य जातींच्या मुसलमानांना राज्यात महत्त्वाच्या जागांवर नेमले. तिने ख्वाजा मुहाजुबुद्दीन याला आपला वजीर नेमले. त्यामुळे तुर्क सरदारांची अहंकार व एकाधिकाराची भावना दुखावली गेली. रझियाने जमालुद्दीन याकूत नामक एका हब्शी गुलामाला 'अमीर-ए-आखूरचे' पद दिले. अशा प्रकारे तिने आपला पक्ष बळकट केला होता.

रझिया ही उद्दाम प्रकृतीची, अहंकारी व तडफदार स्त्री होती. राज्यकारभारातील तिची हुशारी, नैपुण्य व प्रभुत्व पाहून चालीसगनी गटाचे सरदार तिचा द्वेष करू लागले. एका स्त्रीने आपणावर हुकुमत गाजवावी ही कल्पना त्यांना मान्य नव्हती. विरोधकांचा प्रमुख अमीर-ए-हाजीब पदावर काम करणारा इख्तियारुद्दीन एतिगीन हा होता. मलिक अल्तूनिया व कबीरखान हे त्याचे साहाय्यक होते. याचवेळी ती एका स्त्रीसुलभ दुर्बलतेला बळी पडली. 'अमीर-ए-आखूर' जमालुद्दीन याकूतवरील प्रेमामुळे सर्वांची तिच्यावर इतराजी झाली. राज्यात ठिकठिकाणी तिच्याविरुद्ध बंडे होऊ लागली. सर्वप्रथम लाहोरचा



सुभेदार कबीरखान याने तिच्याविरुद्ध बंड केले परंतु स्वतः रझियानेच या बंडाचे पारिपत्य केले (इ. स. १२४०). त्यानंतर कबीरखानाचा मित्र भटिंड्याचा राज्यपाल मलिक अल्तुनिया यानेही बंड केले. बंडाचा मोड करण्याकरिता रझिया स्वतः गेली; परंतु तिचा पराभव झाला. इकडे इतर सरदारांनी कट करून जमालुद्दीन याकूतास गुप्तपणे ठार मारले. परिस्थिती सावरण्याकरिता व पुन्हा सत्ता काबीज करण्याकरिता रझियाने मलिक अल्तुनियाशी विवाह केला आणि ती पतीसह ससैन्य दिल्लीला येण्यास निघाली. परंतु सुलतान बहरामच्या समर्थकांनी या दोघांचा पराभव केला. पराभवानंतर दोघेही पळून जात असता कैथल येथे दरोडेखोरांनी त्यांना १३ ऑक्टोबर १२४० रोजी ठार मारले. अशा रीतीने मध्यकाळातील एका तडफदार व कर्तृत्वसंपन्न स्त्रीचा हृदयद्रावक अंत झाला.

**योग्यता :** दिल्लीच्या सिंहासनावर सार्वभौम शासक म्हणून राज्य करणारी रझिया ही पहिली व शेवटची स्त्री होती. ती अत्यंत महत्त्वाकांक्षी, राजकारणपटू व कारस्थानी होती. सर्वसमकालीन इतिहासकारांनी तिची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. रियासतकार गो. स. सरदेसाई तिच्याबद्दल अत्यंत मार्मिकतेने उल्लेख करताना लिहितात, "वास्तविकपणे राज्यकारभार चालविण्यास ती समर्थ होती; परंतु स्त्रीने राज्य करावे ही कल्पना तुर्क लोकांना खपली नाही." याच कारणाने रझियाचे पतन झाले. तिच्या उदाहरणावरून हे सिद्ध होते की, स्त्रिया कितीही योग्य असल्या तरी मध्ययुगीन कट आणि कारस्थानांनी भरलेल्या राजकारणात त्यांना काही स्थान नव्हते आम्हाला असे वाटते की, अल्तमशचा मृत्यू व बलबनचे सत्तारूढ होणे या दरम्यान सुलतान आणि तुर्क सरदारांमध्ये सत्तालालसेपायी जो संघर्ष चालत आला होता त्यात रझियाचा बळी पडला.

## सुलतान गयासुद्दीन बलबन (इ. स. १२६६ ते इ. स. १२८६)

**पूर्ववृत्त :** बलबनचे मूळ नाव बहाउद्दीन होते. त्याचा पिता इलबरी तुर्क जमातीच्या १०,००० परिवारांचा 'खान' (पुढारी) होता. लहानपणीच मंगोलांनी त्यास पकडून बसऱ्याच्या ख्वाजा जमालुद्दीनास विकले. याच ख्वाजापासून अल्तमशने बलबन यास गुलामांच्या बाजारात विकत घेतले. बलबन शूर, बुद्धिमान व गुणी असल्याने अल्तमशने त्यास गुलामगिरीतून मुक्त करून त्याची नेमणूक चाळीसगनी सरदारांच्या गटात केली. रझियाच्या कारकीर्दीत तो अमीर-ए-शिकारच्या पदावर कार्य करीत होता. हळूहळू त्याचे दरबारातील प्रस्थ वाढू लागले सुलतान बहरामने त्याला 'अमीर-ए-आखूरचे पद व रेवाडीची जहागीर दिली. इ स. १२४४ मध्ये सुलतान अलाउद्दीन मसूदशहाने त्याला अमीर-ए-हाजिब नेमले. इ. स. १२४४ मध्ये त्याने मंगोल सरदार मंगूरखानला उच्च येथून पिटाळून लावल्यामुळे दरबारात त्याचे महत्त्व खूप वाढले. इ. स. १२४६ मध्यें त्याने कट करून सुलतान अलाउद्दीन मसूदशहाला एकीकडें सारून अल्तमशचा मुलगा नासिरुद्दीन महमूदशहा याला गादीवर बसविण्यात यश मिळविले. नासिरुद्दीनाने या कामगिरीबद्दल त्याला इ.स. १२४९ मध्ये 'नायब-ए-मुयालिकात(सुलतानचा प्रतिनिधी) पद देऊन त्यासोबतच 'उलूघ-खान' ही पदवी पण दिली. सुलतानचा बलबनवर पूर्ण विश्वास होता. त्याच्या कारकीर्दीत

राज्याची धुरा बल्बनने १९ वर्षेपर्यंत उत्तम प्रकारे सांभाळली. इ.स. १२६६ मध्ये सुलतान निपुत्रिकावस्थेत मरण पावला. हे पाहून पंतप्रधान पदावर काम करणाऱ्या बलबनने सर्व सत्ता हातात घेऊन 'सुलतान गयासुद्दीन बलबन' या नावाने राज्य करण्यास सुरुवात केली.

## बलबनची राज्यव्यवस्था

(१) **चाळीस सरदारांच्या गटाचा नाश** : राजसत्ता काबीज केल्यानंतर बलबनने आपला वचक बसावा आणि सत्तेस बळकटी आणावी याकरिता चाळीस गनी गटाच्या सरदारांचा नायनाट करण्याचे ठरविले. तत्कालीन राजकारणात त्यांची फार ढवळाढवळ चातल असे. सुलतानास ते आपल्या बरोबरीचा समजत असत. सुलतानाने सदैव आपल्या तंत्राप्रमाणे चालावे अशी त्यांची इच्छा होती परंतु बलबनला मात्र त्यांचा हा वरचढपणा सहन होणारा नव्हता. या सरदार गटाची सत्तेतील मक्तेदारी समाप्त करण्याच्या इच्छेने बलबनने सुयोग्य व कर्तबगार मुसलमानांस राज्यातील उच्च जागांवर नेमले. तसेच या गटातील सरदार व अमीरांना त्यांच्या क्षुल्लक अपराधांकरिता कठोर शिक्षा ठोठावून त्यांची प्रतिष्ठा समाप्त केली. उदा. बदायूचा राज्यपाल मलिक बकबकने आपल्या नोकराला नोकरांकरवी एवढे फटके मारले की, त्या माराने तो मरण पावला. सुलतानाने मलिक बकबकला पकडून दरबारात आणले व मरेपर्यंत फटके मारण्याची शिक्षा फर्माविली. अशाच प्रकारच्या दुसऱ्या एका उदाहरणात अवधचा सुभेदार अमीर हैबतखान याने दारूच्या नशेत आपल्या नोकराला ठार मारण्याचे प्रकरण उघडकीला आले असता त्याही प्रकरणात सुलतानाने अमीर हैबतखानाला ५०० फटके मारल्यावर मृत नोकराच्या पत्नीच्या स्वाधीन करण्याची शिक्षा फर्माविली. हैबतखानाने २० हजार टंका दंड भरून कसेतरी आपले प्राण वाचविले. पण झालेल्या बेअब्रूने तो एवढा लज्जित झाला की, नंतर मरेपर्यंत त्याने घराबाहेर पाऊल टाकले नाही. अवधचा राज्यपाल अमीनखान बंगालच्या तुघ्रीलबेगकडून पराजित होऊन पळून आला होता. बलबनने त्याला पकडून अयोध्या शहराच्या प्रवेशद्वारावरच फासावर लटकाविले. असे म्हणतात की, बलबनने आपला चुलत भाऊ शेरखान संकरलाही असेच गुप्तपणे आपल्या मार्गातून दूर केले. शेरखान अत्यंत महत्त्वाकांक्षी व शूर योद्धा होता. ३० वर्षेपर्यंत त्याने भटिंडा, भटनेर, समाना व सुनाम या सीमा प्रदेशाचा सुभेदाराच्या रूपाने कार्य करीत असताना मंगोल आक्रमकांना यशस्वीरीत्या परतावून लावले होते. बलबनने त्याला एकदा मेजवानीस बोलावले व गुप्तपणे विषप्रयोग करून त्याचा काटा काढला. चाळीसगनी गटातील हलक्या कुळातील लोकांना बलबनने काढून टाकले. या गटातील अनेक सरदारांच्या जहागिरींची त्याने चौकशी केली व त्यांच्या जहागिरी जप्त केल्या. या गटातील मृत सरदारांच्या विधवा स्त्रियांकडूनही त्यांच्या जहागिरी खालसा करण्यात आल्या. अशा प्रकारे बलबनने अत्यंत धूर्तपणे कठोर उपायांचा अवलंब करून अल्तमशच्या मृत्यूनंतर आलेल्या दुबळ्या सुलतानांना आपल्या हातातील खेळणे बनवून डोईजड झालेल्या या प्रभावशाली सरदारांच्या गटाचा नाश केला.

(२) **गुप्तहेर व्यवस्था** : राजयंत्रणा सुरळीत चालण्याकरिता बलबनने या खात्यावर अतोनात पैसा व शक्ती खर्च केली. राजधानीतील शहरे, सरकारी कार्यालये, सरदार-



> ९. सुलतान ग्यासुद्दीन बलबन
> (इ. स. १२६६--८६)
> पूर्ववृत्त,
> बलबनची राज्यव्यवस्था–
> १. चाळीस सरदारांच्या गटांचा नाश
> २. गुप्तहेरव्यवस्था,
> ३. सैन्यव्यवस्था,
> ४. बंडांचा बिमोड–
> अ– मेवात्यांचे बंड,
> ब– दुआब कटिहारचे बंड,
> क– तुघरील बेगचे बंड,
> मंगोलांचे पारिपत्य,
> बलबनचा राजसत्तेचा नवा सिद्धांत,
> बलबनचा दरबार,
> योग्यता,
> अल्तमश व बलबनच्या कामगिरीची तुलना,
> गुलाम घराण्यातील सर्वश्रेष्ठ सुलतान कोण ?

वर्गाच्या घरी व सार्वजनिक ठिकाणी त्याने गुप्तहेरांची नेमणूक केली. राज्यात घडणाऱ्या सर्व महत्त्वाच्या घटनांची माहिती या गुप्तहेरांना दररोज सुलतानाकडे पाठवावी लागे. कर्तव्यभ्रष्ट गुप्तहेरांची चौकशी केली जाऊन सुलतान त्यास कठोर दंड देत असे. उदाहरणार्थ, मलिक बकबक या सरदाराच्या गुन्ह्याची बातमी लपवून ठेवणाऱ्या गुप्तहेरास बलबनने बदायू शहराच्या प्रवेशद्वारावर फासावर लटकाविले.

(३) **सैन्य व्यवस्था** : कोणत्याही राज्याच्या स्थिरतेस प्रबळ अशा सैन्यबळाची नितांत आवश्यकता असते. मंगोलांच्या सतत आक्रमणामुळे बलबनला राज्यविस्तार करता आला नाही. तरी त्याने सैन्याचे संघटन व स्थिती सुधारण्याकडे बरेच लक्ष दिले होते. ऐबकाच्या कारकीर्दीपासूनच लष्करातील सर्व सैनिक व अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्याच्या मोबदल्यात जहागिरी देण्याची प्रथा चालू होती. जहागिरीच्या प्राप्तीमुळे सैन्यातील लोक चैनी, आळशी व कामचुकार होतात, हे लक्षात आल्याने बलबनने सर्व जहागिरी जप्त करण्याचा हुकूम काढला. परंतु दिल्लीचा कोतवाल मलिक फखरुद्दीनाच्या युक्तिवादाने प्रभावित होऊन त्याला हा हुकूम मागे घ्यावा लागला. सुलतानाने सर्व सैन्यास रोख पगार देण्याची पद्धत सुरू केली सैन्यव्यवस्थेचे पुनर्गठन करण्याचे कार्य त्याने दिवान ए-आरिज, इमाद-उल-मुल्क याजकडे सोपविले. सैनिकांची भरती, बढती, सैन्याला आवश्यक अशा सामानाची जुळवाजुळव, सैनिकांचा पगार आणि शिस्त इ. गोष्टींकरिता नवीन नियम तयार करण्यात आले सरकारी मालकीच्या घोड्यांची सैनिकांना अदलाबदल करता येऊ नये म्हणून घोड्यांना डाग देण्याची प्रथा सुरू करण्याचे श्रेय सर्वप्रथम बलबनलाच द्यावे लागेल बलबनची व्यावहारिक बुद्धी व इमाद-उल-मुल्कच्या कर्तव्यतत्परतेमुळे सैन्यव्यवस्थेचा कायापालट होऊन ती जास्त कार्यक्षम झाली.

(४) **बंडांचा बिमोड** : गुलामवंशी सुलतानांनी नवीन प्रादेशिक विजय फारसे केले नाहीत. त्यांची सर्व शक्ती पूर्वी जिंकलेले प्रदेशच पुन: पुन: जिंकण्यात खर्च झाली. बलबनलाही बराच काळ हिंदू व मुसलमानांच्या बंडांचा मोड करण्यात घालवावा लागला.

(अ) **मेवात्यांचे बंड** : मेवातचा प्रदेश दिल्लीलगत असल्याने मेवाती लोक राजधानी सभोवतालच्या प्रदेशात लुटालूट व जाळपोळ करीत असत. कधी कधी ते राजधानीत

शरून फार खळबळ माजवीत. बलबनने मेवात्यांचे अत्यंत निष्ठुरतेने पारिपत्य केले. त्यांची गावे व शहरे उध्वस्त करण्यात आली. ते ज्या जंगलाचा आश्रय घेत ती जंगलेही तोडून सुलतानांच्या सैनिकांनी हजारो मेवात्यांची क्रूरपणे कत्तल केली. अशा रीतीने या बंडाचा पूर्णपणे बिमोड करण्यात आला.

**(ब) दुआब व कटिहारचे बंड :** मेवात्यांप्रमाणेच गंगा व यमुनेच्या दोआबात हिंदू व राजपूत लुटारूंचा फार सुळसुळाट झाला होता. रोहिलखंडातील बदायूं, अमरोहा व पटीयाली इ. भागांत त्यांनी बराच धुमाकूळ घातला होता. बलबनने बंडखोरांचा पराभव करून असंख्य स्त्री-पुरुषांची कत्तल केली. बंडखोरांवर कायमचे नियंत्रण ठेवण्याकरिता सुलतानने या प्रदेशात किल्ले बांधून लष्करी चौक्या स्थापन केल्या. यामुळे सर्वत्र शांतता व सुव्यवस्था स्थापन केली जाऊन पुन: बंडाचा उपद्रव झाला नाही.

**(क) तुघरीलबेगचे बंड (इ.स. १२७९) :** बंगालचा गव्हर्नर तुघरीलबेग हा बलबनचा प्रमुख सरदार होता. काही लोकांच्या चिथावणीने तो स्वतंत्र झाला. त्याने आपल्या नावाची नाणी पाडली. बलबनने पारिपत्याकरिता पाठविलेल्या सेनापतींचा अनुक्रमे अवधचा सुभेदार अमीनखान, तिरमली व नंतर शहाबुद्दीन इ. चा तुघरीलने पराभव केला. तेव्हा बलबन स्वत: ससैन्य बंगालवर स्वारी करण्यास निघाला. सुलतानाने तुघरीलचा पराभव करून त्याच्या समर्थकांसह त्यास कैद केले पुढे त्या सर्वांना सामूहिकपणे लखनौती येथे फासावर चढविण्यात आले समकालीन इतिहासकार जियाउद्दीन बरनी या फाशीच्या दृश्याचे वर्णन करताना लिहितो, "मुख्य बाजाराच्या दोन्ही बाजूस दोन मैल लांबीच्या एका रस्त्यावर वधस्तंभ उभारण्यात येऊन त्यावर तुघरीलच्या साथीदारांची शरीरे ठोकण्यात आली होती, पाहणाऱ्यांनी असे भयंकर दृश्य पूर्वी कधीही पाहिले नव्हते, ते पाहून अनेकजण भयाने व घृणेमुळे बेशुद्धच पडले." सुलतानाने आपला मुलगा बुगराखान यास बंगालचा सुभेदार नेमले. यावेळी बलबनने त्यास उपदेश करून अशी सक्त ताकीद दिली की, "जर इतर प्रांतीय सुभेदार सुलतानाच्या सत्तेविरुद्ध उठाव करून स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करतील तर त्यांनाही तुघरीलप्रमाणे शिक्षा ठोठावण्यात येतील."

**मंगोलांचे पारिपत्य :** वेळोवेळी होणारी मंगोलांची आक्रमणे ही दिल्लीच्या सुलतानांची कायमची डोकेदुखी होती. सुलतानशाहीतील विशेषत: गुलाम, खिलजी आणि तुघलक शासकांच्या काळात वायव्येकडून मंगोलांची शेकडो आक्रमणे झाली. ही समस्या सोडविण्याकरिता बलबनने प्रशंसनीय प्रयत्न केले. यामुळेच त्याला साम्राज्यविस्तार करता आला नाही, पंजाबातील लाहोरपर्यंतच्या प्रदेशात मंगोलांनी आपले प्रभावक्षेत्र कायम केले होते. पण व्यास नदी पलीकडे त्यांना जाऊ न देण्याचा बलबनचा निर्धार होता. त्यांच्या आक्रमणापासून देशाचे संरक्षण व्हावे याकरिता बलबनने एक उत्तम योजना तयार केली. त्याने सीमाविभागात अनेक किल्ले बांधून या किल्ल्यांमध्ये अत्यंत शूर व कडव्या अफगाण सैनिकांची नेमणूक केली त्याने सीमाप्रदेशाचे दोन विभाग पाडले. त्यांपैकी सुन्नाम व समाना या प्रदेशांवर राजपुत्र बुगराखान याची नेमणूक केली. मुलतान, सिंध व लाहोर या प्रदेशांचा बंदोबस्त बलबनने आपला मोठा मुलगा राजपुत्र मोहम्मद याजकडे सोपविला



होता. राजपुत्र मोहम्मद उर्फ 'खानेशहीद' याने मंगोलांच्या अनेक स्वाऱ्या मोठ्या शौर्याने परतविल्या. इ. स. १२८५ मध्ये अफगाणिस्तानचा मंगोल शासक तैमूरखांने मोठी स्वारी करून लाहोर व देपाळपूर प्रदेश लुटले. मोहम्मद हा हल्ला परतावून लावण्याच्या प्रयत्नात इ स. १२८६ मध्ये मारला गेला. राजपुत्र मोहम्मद हा बलबनचा अत्यंत लाडका मुलगा होता, त्याच्या मृत्यूचा बलबनला जबरदस्त धक्का बसला. वृद्धापकाळातील या वज्राघाताने सुलतान इ.स. १२८७ मध्ये मरण पावला. मृत्यूपूर्वी त्याने आपला नातू राजपुत्र कैखुसरो (मोहम्मदाचा मुलगा) याचा हात सरदारांच्या हाती देऊन समाधानाने प्राण सोडला. डॉ. ईश्वरीप्रसाद लिहितात, "ही निवड चुकीची सिद्ध झाली व त्यामुळे गुलाम घराण्याची सत्ता कायमची समाप्त झाली."[१]

**बलबनचा राजसत्तेचा नवा सिद्धांत :** राजपदाविषयी बलबनच्या स्वतंत्र कल्पना होत्या. अल्तमशनंतर आलेल्या दुर्बल सुलतानांमुळे राजपदाची प्रतिष्ठा लयास गेली होती. राजसत्तेबद्दल प्रजेच्या व तुर्क सरदारांच्या मनात भय राहिले नव्हते. बलबन 'दैवी राजसत्तेच्या तत्त्वाचा' (Divine Right of Kingship) समर्थक होता. सुलतान हा ईश्वराचा प्रतिनिधी आहे. राजसत्तेची कोणीही बरोबरी करू शकत नाही, अनियंत्रित स्वेच्छाचारी राजसत्ताच प्रजेच्या मनात भय निर्माण करू शकते, लोकांच्या मनात भयाची भावना निर्माण केल्यासच ते राजसत्तेला मान देतील व त्यामुळे राज्यही सुरक्षित राहील, अशी बलबनची कल्पना होती, तो म्हणत असे–"राजाचे हृदय ईश्वरी कृपेचे विशेष भांडार असते. या दृष्टीने कोणीही मनुष्य त्याची बरोबरी करू शकणार नाही." राजपद उच्च कुलोत्पन्नांनाच प्राप्त होते अशी बलबनची धारणा होती, याकरिता त्याने आपला संबंध सुप्रसिद्ध तुराणी दैवी पुरुष "अफरे-शियाब"शी जोडला. राजपुरुषाबद्दल लोकांच्या मनात आदर व वचक निर्माण करण्याकरिता बलबनने नवीन नियम व रूढी निर्माण केल्या. त्याच्याबरोबर सदैव राहणाऱ्या सेवकांना त्याला केवळ राजोजित वस्त्रांमध्येच पाहावयास मिळाले. आपल्या कारकीर्दीत त्याने कधीही निम्न कुलोत्पन्न अथवा हीन व्यवसाय करणाऱ्या लोकांशी संभाषण किंवा मैत्री केली नाही. अशा लोकांबरोबर स्वत: त्याने थट्टाविनोद करणे बंद केले. फार काय इतरांनाही आपल्या उपस्थितीत तसे करू दिले नाही. सरदार अथवा सेवकांच्या उपस्थितीत स्वत: तो कधी मोठ्याने हसला नाही, तसेच इतरांनाही हसण्यास मनाई केली. जोपर्यंत तो जिवंत होता तोपर्यंत त्याच्या कोणाही कर्मचाऱ्याला अथवा घनिष्ठ मित्रालादेखील त्यांच्याकडे सरकारी नोकरीकरिता एखाद्या हीन कुलोत्पन्न व्यक्तीची शिफारस करण्याचे धैर्य झाले नाही. जाणूनबुजून त्याने एकांतात राहण्याची सवय स्वत:ला जडवून घेतली होती. त्यामुळे गंभीरता हा त्याच्या स्वभावाचा एक महत्त्वाचा घटक झाला होता. अशा रीतीने परिस्थिती व पूर्ववर्ती शासकांच्या कारकीर्दीचा अभ्यास करून बलबनने आपल्या राजत्वासंबंधीच्या कल्पनांना मूर्त स्वरूप दिले होते. हीच त्याली सुलतानशाहीतील फार मोलाची कामगिरी मानावी लागेल.

[१] डॉ. ईश्वरीप्रसाद भारतीय मध्ययुगाचा इतिहास पृ. १९१–९२.



Scanned with CamScanner

त्याने हीन कुळातील लोकांच्या भेटीगाठी घेणे व त्यांच्याशी बोलणेदेखील वर्ज्य केले. सुलतानाला आपल्या उच्च कुळाचा इतका प्रखर अभिमान होता की, तो खालच्या जातीतील लोकांना उच्च पदे कधीही देत नसे. त्यांच्याकडून कधीही भेट व नजराणे स्वीकारीत नसे. उदा. कमाल महया अमरोहा यास तो नवमुस्लिम असल्याने प्रशासकीय पद देण्यास सुलतानाने नकार दिला अनेक निम्न जातींतील लोक महत्त्वाच्या सरकारी पदांवर कार्य करीत होते. बलबनने त्यांची माहिती कळताच त्यांना पदच्युत केले. तुर्केतर मुसलमान जातीच्या लोकांना तसेच भारतीय मुसलमानांना सरकारी नोकरीत उच्च पदां- वर नियुक्त करण्याच्या तो विरुद्ध होता. दिल्लीच्या फखरू नामक एका धनिक व्यापा- ऱ्याने सुलतानाची भेट घेण्याकरिता लाखो रुपये देण्याची तयारी दर्शविली, परंतु सुलतानाने तो निम्नकुलोत्पन्न आहे असे कळताच भेट घेण्यासही नकार दिला. प्रत्येक व्यक्तीने सुल- तानाप्रती सन्मान प्रगट करताना त्याला सिजदा (साष्टांग नमस्कार, व पाबोस (पायाचे चुंबन घेणे) करावा, असा बलबनने दंडकच घातला होता.

आपला हेतू साध्य करण्याकरिता सुलतानाने बिस्मार्कप्रमाणेच 'रक्त आणि तल- वारीच्या' (Blood and Iron) धोरणाचा राजकारणात सूत्रपात केला. या तत्त्वाच्या बळावर त्याने बंडाळीचे क्रूरपणे दमन केले, प्रखर विरोधकांचा निर्घृणपणे काटा काढला आणि उलेमा व अमीर-उमरावांवर कठोर नियंत्रण ठेवण्यात यश प्राप्त केले. अनियंत्रित स्वेच्छाचारी राजसत्ता स्थापण्यात बलबनला अनन्यसाधारण यश मिळाले होते.

**बलबनचा दरबार :** बलबनने आपला दरबार इराणी धर्तीवर ठेवला होता. त्याने सेलजुक तुर्क व ख्वारीजमच्या दरबारात असलेले शिष्टाचार व रीतीभाती आपल्या दर- बारात रूढ केल्या. दरबाराची भव्यता, डामडौल व थाटमाट वाढविला. त्याचा दरबार पाहणाऱ्या लोकांचे डोळे दिपून जात. सुलतानाबरोबर सदैव तळपत्या तलवारी धारण करणारे अंगरक्षक राहत असत. त्याच्या दरबारी इराणी सण 'नौरोज" मोठ्या थाटा- माटात साजरा होई. त्याच्या दरबाराची ख्याती सर्वदूर पसरली होती.

**योग्यता :** सुलतान गयासुद्दीन बलबनने एकूण ४० वर्षे राज्य केले त्यातली पहिली २० वर्षे (इ.स. १२४६ ते इ.स. १२६६ पर्यंत) त्याने सुलतान नासिरुद्दीन महमूदाचा कारभारी म्हणून व नंतरची २० वर्षे (इ.स. १२६६ ते इ.स. १२८६ पर्यंत) स्वतंत्र सुलतान म्हणून कारभार पाहिला. साम्राज्यविस्ताराऐवजी हाती असलेल्या प्रदेशाचे संरक्षण व संघटन करण्याकडेच बलबनचा जास्त कल होता. तुर्कांच्या मानवी शक्तीचा युद्धात अकारण नाश व्हावा अशी त्याची इच्छा नव्हती. आपल्या शक्ती व सामर्थ्याची त्यास पूर्णपणे कल्पना होती.

आपल्या सर्व कार्यात बलबनने आदर्शवाद व प्रत्यक्ष व्यवहार यांचे मनोहर मिश्रण केल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. उदा. चाळीस गुलामांच्या संघटनेचा विनाश, परकीय आक्र- मणाच्या बंदोबस्तासाठी सुनियोजित सरहद्द धोरण, न्यायनिष्ठुरपणा, बंडखोरांचे निर्घृण- पणे केलेले दमन, परकीय लोकांशी स्थापन केलेले मित्रत्वाचे संबंध व राजदरबारचे



संघटन व नियम आणि लष्कर-सुधारणा कार्यक्रम इ. कार्ये त्याच्या व्यवहारनिपुणतेची साक्ष देतात. त्याचा आदर्शवाद त्याच्या राजपदविषयक कल्पनेत स्पष्ट दिसून येतो. बलबनच्या या विविध कार्यांनीच पुढील सुलतानांना प्रत्यक्ष मार्ग दाखवून दिला. त्याने राज्याला बळकटी आणण्याकरिता सर्व प्रकारच्या साधनांचा बिनदिक्कतपणे उपयोग केला होता. त्याने राज्यकारभारात सुधारणा करून गतप्राण झालेल्या जुन्या संस्थांचे पुनरु- ज्जीवन केले होते.

बलबनची सर्वांत मोठी कामगिरी त्याने शक्तिशाली तुर्क सरदारांचे दमन करून सुलतानपदाची गेलेली प्रतिष्ठा पुन: प्राप्त करणे ही होती. स्टन्ले लेनपूल आपल्या मध्य- कालीन भारतात लिहितो, "गुलाम, भीश्ती (पाणी भरणारा), शिकारी, सेनानायक, राजनीतीज्ञ व सुलतान इ' विभिन्न रूपात कार्य करणारा बलबन हा दिल्ली शासकांच्या दीर्घ परंपरेतील सर्वाधिक आकर्षक व्यक्तींपैकी एक आहे." स्वभावाने तो अत्यंत धार्मिक होता तो कट्टर सुन्नी होता. चारित्र्यसंपन्न धर्मगुरूंच्या सहवासात राहणे त्याला आवडे. त्यांच्याबरोबर तो भोजन घेई व विविध धार्मिक विषयांवर त्यांच्याशी चर्चा करी हिंदू- बद्दल त्यास घृणा वाटत असे. नमाज व धार्मिक रीतीरिवाजांचे तो कसोशीने पालन करी. मुसलमानी साधू-संत, फकीर व विद्वान पंडितांना त्याने राजाश्रय दिला होता, तो अत्यंत न्यायनिष्ठुर होता.

विद्या व कलांना बलबन प्रोत्साहन देई. मध्य आशियातील अनेक विद्वान, कलाकार व राजपुत्रांनी त्याच्या दरबारी आश्रय घेतला होता. त्याचे व्यक्तिगत जीवन पवित्र होते. त्यास कोणतीही व्यसने नव्हती. त्याने नवस्थापित तुर्क राज्याचे संघटन व संरक्षण करून देशात शांतता व सुव्यवस्था स्थापन केली. त्याचप्रमाणे 'रक्त आणि तलवार' यांच्या साहाय्याने राजपदाची प्रतिष्ठा व महत्त्व वाढवून लोकात दरारा निर्माण केला. एका विद्वान इतिहासकाराने बलबनच्या कामगिरीबद्दल मार्मिक उल्लेख केलेला आहे हा इति- हासकार लिहितो की, "जर बलबनप्रमाणे दृढनिश्चयी, अनुभवी, प्रतिभासंपन्न आणि नीतिनिपुण पुरुष त्यावेळी दिल्लीचा राजा झाला नसता तर दिल्लीत सुलतानशाहीचे अस्तित्वही शिल्लक राहणे कठीण होते." याच कारणाने बलबनला तेराव्या शतकातील राज्यकर्त्यांत एक विशिष्ट स्थान प्राप्त झाले आहे त्याने प्रारंभ केलेल्या नीतीचा अवलंब व संवर्धन करून अलाउद्दीनाने निरंकुश खिलजी साम्राज्यवादाची स्थापना केली. म्हणूनच बलबनला अलाउद्दीनचा "मार्गदर्शक" (Forerunner) असेही म्हणतात.

**अल्तमश व बलबनच्या कामगिरीची तुलना**

प्रा. श्रीनेत्र पांडे यांनी अतिशय सुंदर शब्दांत गुलाम घराण्यातील शासकांची तुलना केली आहे. अल्तमश व बलबन हे दोघेही गुलामवंशी सुलतानांत थोर समजले जातात. दोघेही शासक पूर्वायुष्यात गुलाम होते. आपल्या अंगभूत गुणांच्या बळावर त्यांनी सुल- तानपद प्राप्त केले होते. सिंहासनारूढ होण्यापूर्वी बलबनला अल्तमशपेक्षा राजकारणाचा जास्त अनुभव मिळाला होता. नासिरुद्दीन महमूदशहाच्या कारकीर्दीत जरी तो पंतप्रधान



Scanned with CamScanner

असला, तरी राज्याची समस्त सत्ता त्याच्याच हाती होती. राज्यारोहणापूर्वी अल्तमशला अशी संधी मिळाली नव्हती. नासिरुद्दीन महमूदशहाने स्वतःस मुलगा नसल्याने बलबनलाच आपला वारस नेमले होते, तर सक्तीच्या बळावर आरामशहास पदच्युत करून अल्तमशला गादी मिळवावी लागली होती. सिंहासनारोहणसमयी बलबनला अल्तमशप्रमाणे नानाविध अडचणींना तोंड द्यावे लागले नव्हते. नासिरुद्दीन महमूदशहाच्या वेळी तो स्वतःच पंतप्रधान असल्याने त्याने मुसलमानी राज्य व सत्ता अत्यंत उत्कृष्टपणे संघटित व सुव्यवस्थित केली होती त्यामुळे सुलतानपद प्राप्त होतेसमयी त्याला सुसंघटित राज्य मिळाले होते.

अत्यंत भयानक परिस्थितीत अल्तमश सुलतान झाला होता. आरामशहाच्या दुर्बलतेमुळे ऐबकाचे राज्य छिन्नभिन्न झाले होते. अनेक प्रतिस्पर्धी दिल्लीचे राज्य बळकावण्याच्या खटपटीत होते त्यामुळे अल्तमशला सुलतानशाहीची पुनः नव्याने स्थापना करावी लागली. बलबनला अंतर्गत बंडांचा उपशम करावा लागला. परंतु अल्तमशप्रमाणे त्याला प्रतिस्पर्धी नव्हते हे मान्य करावे लागेल. साधनांच्या बाबतीत बलबन हा अल्तमशपेक्षा अधिक वरचढ होता, तर लष्करी श्रेष्ठत्वात अल्तमश बलबनपेक्षा वरचढ होता. ऐबकाने प्रारंभ केलेले कार्य अल्तमशने यशस्वीपणे पूर्ण केले. ऐबकाच्या मृत्यूनंतर खंडित झालेल्या मुसलमानी राज्याची त्याने पुन्हा स्थापना केली, किंबहुना अल्तमशने त्या राज्यात नव्या प्रदेशांची भर घातली. संपूर्ण उत्तर भारतात मुसलमानी सत्ता स्थापन करण्याचे श्रेय अल्तमशलाच द्यावे लागेल. संपूर्ण हयातभर बलबनला बंडांचा बिमोड करावा लागला. त्याला मंगोलांच्या सतत होणाऱ्या आक्रमणाला प्रतिबंध घालावा लागला, त्यामुळे राज्यविस्ताराकडे त्याला लक्ष देता आले नाही. म्हणून एका थोर विजेत्याचा मान त्याला देता येणार नाही. सुंदर राज्यव्यवस्था निर्माण करून मुसलमानी सत्तेला बळकटी आणण्याकरिताच तो प्रसिद्ध आहे. तसे पाहिल्यास भारतविजयाचे कार्य ऐबक व अल्तमशने आधीच पूर्ण केले होते. त्यावेळी अशा व्यक्तीची नितांत गरज होती, जी मुसलमानी सत्तेस स्थैर्य प्राप्त करून देईल. कारण, वरील दोघांना लढायांमुळे हे कार्य करता आले नव्हते. या न्यूनत्वाची बलबनने भरपाई केली होती.

अल्तमश व बलबन या दोघांनाही अंतर्गत कलह व परकीय आक्रमणांना तोंड द्यावे लागले होते. दोघांनीही हे कार्य उत्तमपणे पार पाडले. परंतु दोघांच्या अंतर्गत व बाह्य धोरणात बरेच अंतर होते. आपल्या सत्तेला दृढता प्राप्त होण्यासाठी अल्तमशने चाळीस निवडक गुलाम सरदारांची एक प्रबळ संघटना तयार केली होती, तर बलबनने नेमक्या याच संघटनेचा अंत करून आपली सत्ता सरदारवर्गाच्या प्रभावातून मुक्त केली. अल्तमश व बलबन हे दोघेही मुसलमानी धर्मगुरूंबद्दल पराकाष्ठेचा आदर बाळगत. फरक इतकाच की, कर्तव्यभ्रष्ट धर्मगुरूंना बलबन कठोर दंड देत असे धर्मगुरूंच्या विरुद्ध कार्य करण्याचे धैर्य अल्तमशच्या ठिकाणी नव्हते. दोघांही शासकांना मंगोल आक्रमणांचा बंदोबस्त करावा लागला. परंतु अल्तमशने बलबनप्रमाणे सुनियोजित सीमाधोरणाचा अवलंब केला नव्हता. बलबनचे सीमाधोरण त्या काळात उत्कृष्ट होते. सीमाप्रदेशात कर्तबगार सेना-



पतींच्या आधिपत्याखाली त्याने स्थायी सैन्य ठेवले होते. पंजाबमधील बंडे मोडून अनियंत्रित सरदारवर्गावर त्याने दरारा स्थापन केला होता सुलतानपदाची प्रतिष्ठा दोघांनीही उत्तमपणे राखली दोघेही स्वेच्छाचारी, अनियंत्रित व निरंकुश शासक होते. परंतु बलबनची निरंकुशता लौकिक नियमांनी बंदिस्त नव्हती. तिच्यावर फक्त ईश्वराचेच नियंत्रण होते. खलिफाचे प्रभुत्व अल्तमशने मान्य केलेले होते. किंबहुना खलिफाकडून त्याला 'सुलतान-ए-हिंद'ची पदवी मिळाली होती, तर बलबनचा खलिफाच्या प्रभुत्वावर विश्वास नव्हता. बलबनचे राजकीय धोरण अल्तमशपेक्षा अधिक सरस होते. अल्तमशच्या राजकीय धोरणावर धर्माचा पगडा फार होता. राज्य व धर्माची फारकत करण्यात तो असमर्थ ठरला. मुसलमानी धर्म व त्याच्या अनुयायांचे संरक्षण करण्यातच त्याने आपले इतिकर्तव्य मानले. बलबनने मात्र धर्माला राज्यशकटापासून सदैव दूर ठेवले. जनकल्याण हे तो आपले प्रमुख कार्य समजे.

बलबन व अल्तमश दोघेही विद्वान व साधुसंतांचा आदर करीत. बलबनचा दरबार वैभव व थाटामाटाकरिता समस्त आशिया खंडात ख्यातिप्राप्त होता. दोघेही स्वभावाने उदार व न्यायप्रिय होते. गुन्हेगारांना दंड करण्यात दोघेही निष्पक्ष व कठोर होते त्यांचे व्यक्तिगत जीवन शुद्ध व निष्कलंक होते, दोघांच्याही चरित्र व कामगिरीचे अवलोकन करता त्यांपैकी कोण श्रेष्ठ आहे. हे ठरवणे फार कठीण आहे. काही इतिहासकारांनी या कूट प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु तरीही हा प्रश्न आजतागायत विवादग्रस्तच राहिलेला आहे खऱ्या अर्थी दोघांही सुलतानांनी भिन्न वेळी व भिन्न परिस्थितीत शासन केले. दोघांचेही वैयक्तिक गुण व समस्या वेगवेगळ्या होत्या. दोघांनीही आपापल्या परीने दिल्लीत सुलतानशाहीचे वैभव वाढविण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला होता, हे नमूद करणे भाग आहे.

### गुलाम घराण्यातील सर्वश्रेष्ठ सुलतान कोण ?

गुलाम घराण्यात एकूण दहा सुलतान झाले. त्यांपैकी आरामशहा, रझिया, बहरामशहा, अलाउद्दीन मसूदशहा व मुइजुद्दीन. बहरामशहा व कैकुबाद इ. चा वध झाला. या सर्व शासकांची कारकीर्द अस्थिर व अल्पकालीन ठरली होती. कर्तबगारीच्या दृष्टीने रझियाचे स्थान या सर्वांत श्रेष्ठ होते. तिचा अपवाद वगळता शेष सर्व केवळ नाममात्र शासक होते. राज्याची समस्त सत्ता स्वार्थी, कारस्थानी व सत्तापिपासू सरदारवर्गाच्या हातात होती. हे सुलतान अमीरवर्गाच्या हातातील कळसूत्री बाहुली होते रझियामध्ये कार्यकुशलता, रणकौशल्य व शासनपटुत्व असूनही दुर्दैवाने ती स्त्रीसुलभ भावनांना बळी पडली. तिच्या उदाहरणावरून हे स्पष्ट दिसते की, तत्कालीन कारस्थानी व धामधुमीच्या वातावरणात एका स्त्रीने शासन करणे अशक्य होते, रझियाचा अपवाद सोडता बाकीच्या कमकुवत सुलतानांनी राजपदाची प्रतिष्ठा निश्चितच धुळीस मिळविली होती.

गुलाम घराण्यात ऐबक, शम्सुद्दीन अल्तमश, नासिरुद्दीन महमूद व गियासुद्दीन बलबन इ. ची कारकीर्द अत्यंत यशस्वी ठरली. हे चौघे सुलतान कर्तृत्वसंपन्न होते. त्यांनी

VIVEKANAND COLLEGE LIBRARY
23884
Accn. No.
KOLHAPUR

दिल्ली सुलतानशाहीची अमोल सेवा करून तिची प्रतिष्ठा वाढविली होती. एक ऐबक सोडता तिघाही शासकांची कारकीर्द बरीच प्रदीर्घ होती. या चौघातच सर्वश्रेष्ठ शासक कोण आहे हे पाहणे आवश्यक आहे. ऐबकाने दिल्ली येथे स्वतंत्रपणे राज्य केले. मोहम्मद घोरीच्या भारतातील विजयाच्या कामगिरीत त्याचा हिस्सा फार मोठा होता. त्यानेच भारताचा गझनीशी संबंध तोडला. ऐबकाच्या सर्व मोहिमा तो सुलतान होण्यापूर्वीच झालेल्या होत्या. त्याची चार वर्षांची राजवट क्षणिक ठरली. त्याच्या मृत्यूनंतर शासन-कौशल्याच्या अभावी राज्यात सर्वत्र अराजकता निर्माण झाली. ती नष्ट करण्याचे कार्य अल्तमशने केले.

शमसुद्दीन अल्तमश व गयासुद्दीन बलबन या दोघांची तुलना करण्यापूर्वी नासिरुद्दीन महमूदच्या कारकीर्दीचे महत्त्व समजावून घेणे इष्ट ठरेल. तो एक शांत व सात्विक वृत्तीचा शासक होता. तत्कालीन क्रांतिकारी युगात त्याने उदारपणे शासन केले. त्याच्या कारकीर्दीच्या यशस्वितेचे श्रेय मात्र त्याचा पतप्रधान बलबन यालाच द्यावे लागेल. राज्याची वास्तविक सत्ता त्याच्या कारकीर्दीत बलबनच्याच हातात होती, ऐबक, अल्तमश व बलबनची गुणवत्ता, शौर्य व पराक्रम हे गुण नासिरुद्दीन महमूदमध्ये निश्चितच नव्हते. एका साधारण मनुष्याप्रमाणे त्याच्या कारकीर्दीचे मूल्यमापन करावे लागेल.

सर्वश्रेष्ठत्वाच्या बाबतीत खरी तुलना अल्तमश व बलबनमध्येच होऊ शकेल. आधुनिक इतिहासकारात काहींनी अल्तमशला तर कित्येकांनी बलबनला सर्वश्रेष्ठत्वाचा मान देऊ केला आहे. सदर प्रकरणात या दोघांच्याही व्यक्तिमत्त्व व कामगिरीची चिकित्सक दृष्टीने चर्चा केलेलीच आहे. तेव्हा येथे पुन: त्याची पुनरुक्ती करण्याचे कारण नाही खरे पाहता हे दोन्ही सुलतान भिन्न परिस्थिती व भिन्न कालात अवतीर्ण झाले होते. दोघांच्याही व्यक्तिमत्त्वात वेगवेगळे गुणधर्म दृष्टोत्पत्तीस येतात. त्यामुळेच त्यांची कार्येही निरनिराळी झालेली आहेत आपापल्या कुवतीनुसार दोघांनीही यशस्वीपणे राज्य करून सुलतानशाहीचे नाव सर्वतोमुखी केलेले होते. काही बाबतीत अल्तमशची कामगिरी श्रेष्ठ होती तर काही बाबतीत बलबनचे महत्त्व मोठे मानले जाते. म्हणूनच या दोघांपैकी कोणाही एकाला श्रेष्ठत्वाचा मान देण्याऐवजी दोघांनाही तो समान रूपाने दिला जाणे योग्य ठरेल.



Scanned with CamScanner